संजय गांधी निराधार अनुदान योजना व इतर विशेष सहाय्य योजनांसाठी कार्यालयांकरिता ५७८ संगणक खरेदीस वित्तीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक :विसयो-२०१८/प्र.क्र.१७८/विसयो
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ०८ मार्च, २०१९.

वाचा:-

१. शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, क्रमांक:- भांखस-२०१४/प्र.क्र. ८२/ भाग-III/ उद्योग-४, दि.१ डिसेंबर, २०१६.
२. शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, क्रमांक:- संकीर्ण-२०१६/प्र.क्र. २१५/ उद्योग-४, दि.२४ ऑगष्ट, २०१७.
३. शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, क्रमांक:- भांखस-२०१७/प्र.क्र. २०४/उद्योग-४, दि.०८ डिसेंबर, २०१७.
४. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र. सकआ-२०१२/प्र.क्र.७/आस्था-२, दि.०४ ऑक्टोबर, २०१२.
५. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.सीओएम-२०१५/प्र.क्र.१८/संगणक कक्ष, दि.२० जानेवारी, २०१६.
६. शासन पत्र, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.सीओएम-२०१९/प्र.क्र.१/संगणक कक्ष, दि.७ जानेवारी, २०१९.
७. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक : विसयो-२०१८/प्र.क्र.१७८/विसयो, दि.२८ जानेवारी, २०१९.

प्रस्तावना :-

संजय गांधी निराधार अनुदान योजना व इतर विशेष सहाय्य योजनांसाठी कार्यालयांकरिता संगणक व प्रिंटर यांची संख्या पुरेशी नसल्याने ५७८ नवीन संगणक व ४१९ प्रिंटर खरेदी करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

संजय गांधी निराधार अनुदान योजना व इतर विशेष सहाय्य योजनांसाठी कार्यालयांकरिता ५७८ संगणक व ४१९ प्रिंटर उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या संदर्भाधीन कार्यपध्दतीचा अवलंब करुन गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलद्वारे ऑनलाईन निविदेद्वारे खरेदी करण्यासाठी रुपये ४,९५,६९,५००/- (रुपये चार कोटी पंच्यान्नव लक्ष एकोणसत्तर हजार पाचशे फक्त) इतक्या रकमेच्या मर्यादेत अंदाजित खर्चास संदर्भाधीन क्रमांक ७ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

२. खरेदीच्या शासनाच्या विहित धोरणानुसार गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस(GeM) पोर्टलवरुन Online Bidding पध्दतीने संगणकाचा निविदा क्रमांक GEM/२०१९/B/१६८७१० असा असून निविदा दाखल करण्याची अंतिम मुदत दि.२२/०२/२०१९ रोजी संपली आहे. संगणक खरेदीसाठी एकूण १२ पुरवठादाराच्या निविदा प्राप्त झाल्या असून, त्यापैकी ३ पुरवठादार पात्र ठरले आहे.

दि.०८/०३/२०१९ रोजी झालेल्या विभागाच्या खरेदी समितीच्या बैठकीत संगणकासाठी पात्र ३ पुरवठादारांपैकी MINITEK SYSTEMS INDIA PRIVATE LIMITED या कंपनीची निविदा L१ न्यूनतम पुरवठदाराची असल्याने खरेदी समितीने मान्यता दिली आहे. MINITEK SYSTEMS INDIA PRIVATE LIMITED या कंपनीची एका संगणकाची किंमत रु.६१,४६८/- अशा एकूण ५७८ संगणकाची किंमत (रु.६१,४६८ X ५७८) रु.३,५५,२८,५०४/-सर्व करांसह आहे. GeM पोर्टलवरील Contract No.GEMC- ५११६८७७९९८४६०८ मधील अटी व शर्तीच्या अधिन राहून संगणक खरेदीस रु.३,५५,२८,५०४/- (रुपये तीन कोटी पंचावन्न लक्ष अठ्ठावीस हजार पाचशे चार फक्त) इतक्या रकमेच्या खर्चास वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. विवरणपत्र १ येथे नमूद केलेल्या राज्यातील संजय गांधी निराधार योजना व इतर विशेष सहाय्य योजनेच्या ५७८ कार्यालयांना सदर संगणकाचा पुरवठा उक्त कंपनीने करावयाचा आहे.

३. यासाठी होणारा खर्च सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग “मागणी क्रमांक एन-२, २२५१, सचिवालय - सामाजिक सेवा, (०६) ई गव्हर्नन्स प्रकल्प - राज्य योजनांतर्गत योजना, (०६) (०१)ई गव्हर्नन्स प्रकल्प प्रकल्पाची अंमलबजवाणी (२२५१०९०१), १७ संगणक खर्च” या लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता उपलब्ध असलेल्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदरहू शासन निर्णय वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८, मधील भाग पहिला, उपविभाग-२ मधील अनुक्रमांक २७ अ नियम ७६ अन्वये प्रशासकीय विभागाने प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारान्वये व दि.०८/०३/२०१९ रोजी झालेल्या विभागाच्या खरेदी समितीच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा सगणक संकेतांक २०१९०३१०१७१७४८२२२२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Prashant Pundlik Wagh

Digitally signed by Prashant Pundlik Wagh
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistance, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=759e87fbd1e68c290a7221620636ede8425d6a870aa0240f18d726b6c8e6b832, cn=Prashant Pundlik Wagh
Date: 2019.03.10 17:19:34 +05'30'

(प्रशान्त पुं. वाघ)
कार्यासन अधिकारी , महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपालांचे सचिव
२. मा. मंत्री (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य) यांचे खाजगी सचिव,
३. मा. राज्यमंत्री (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य) यांचे खाजगी सचिव,
४. महालेखापाल, महाराष्ट्र १/२, (लेखा परिक्षा/लेखा अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर
५. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे स्वीय सहायक.

८. संचालक, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. संचालक, MINITEK SYSTEMS INDIA PRIVATE LIMITED, Nashik.
१०.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
११.निवासी लेखा अधिकारी, मुंबई
१२.कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई,
१३.निवड नस्ती, विसयो.